


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक १९५, रविवार १४ एप्रिल २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## दक्षिणेतील विखेंची सत्ता उलथली जाणार!

### ■ ज्येष्ठ पत्रकार हेमंत देसाई यांचे परखड भाष्य ■ लंकेंवर लोकांचे उत्स्फुर्त प्रेम ■ देसाई यांचा जनसंवाद यात्रेत सहभाग

श्रीगोंदे : विशेष प्रतिनिधी

**मी इथले सगळे पहातोय, इथली सत्ता उलथली जाणारच आहे. मी स्पष्ट भूमिका मांडतो. मी तटस्तपणाच्या नावाखाली, निःपक्षपातीपणाच्या नावाखाली मी हे बरोबर आणि तेही बरोबर असे नाही तर आज लंके निवडून आलेच पाहिजेत. ही माझी स्पष्ट भूमिका आहे. लंके यांच्या दौऱ्यासोबत जाताना त्यांच्यावरील लोकांचं प्रेम, उत्स्फुर्त प्रेम, जमवलेली गर्दी नाही हे सतत जाणवत होते असे परखड मत ज्येष्ठ पत्रकार हेमंत देसाई यांनी मांडले.**

लोकसभा निवडणूकीतील राष्ट्रवादी काँग्रेस राष्ट्रवादी काँगेस शरदचंद्र पवार पक्षाचे व महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी गेल्या १ एप्रिलपासून स्वाभिमान जनसंवाद यात्रा सुरू केली असून ही यात्रा सध्या श्रीगोंदे तालुक्यातील विविध गावांमध्ये जाऊन लंके हे नागरीकांशी संवाद साधत आहे. शनिवारी लंके यांच्या या यात्रेत ज्येष्ठ पत्रकार हेमंत देसाई यांनीही सहभाग नोंदवत काही सभांमधून आपले परखड मत मांडले. मा. आ. राहुल जगताप, बाबासाहेब भोस, घनश्याम शेलार, साजन पाचपुते यांच्यासह विविध गावांतील महाविकास आघाडी तसेच लंके समर्थक मोठया संख्येने उपस्थित होते.

देसाई म्हणाले, जे मस्तवालपणा करतात, त्यांच्या विरोधात आम्ही लढतो. आमच्या मागे मोठी आर्मी असते. सोशल मीडिया, फोनवरून धमक्या दिल्या जातात. अशा कोणत्याही धमक्यांना न घाबरता जी सत्याची बाजू आहे, गरीबाची बाजू आहे, शेतकऱ्याची बाजू आहे, जे जे त्यांच्या बाजूने उभे राहतात त्यांच्या मागे उभे राहणे आमचे काम आहे.




■ श्रीगोंदे तालुक्यातील जनसंवाद यात्रेदरम्यान शनिवारी नीलेश लंके यांनी विविध गावांतील नागरीकांशी संवाद साधला. ज्येष्ठ पत्रकार हेमंत देसाई शनिवारी नीलेश लंके यांच्या जनसंवाद यात्रेत सहभागी झाले होते.

### मी लंकेंशी फाडफाड इंग्रजी बोलणार !

मी आता नीलेश लंके यांच्याशी फाडफाड इंग्रजी बोलणार आहे. त्यांच्या आयुष्यात त्यांनी किती इंग्रजी शिकली ते कळेल. एक महिन्याची त्यांना मुदत देण्यात आली आहे. त्यांचा इंग्रजी भाषा आलीच पाहिजे. नाही तर त्यांची काही खैर नाही ! अशा प्रकारचे भाष्य आतापर्यंत कोणी केलं नव्हतं. जे राहुल गांधी फाड फाड इंग्रजीमध्ये बोलतात ते सामान्य माणसाशी हिंदीतच बोलतात. केरळमधील वायनाड मतदारसंघात स्थानिक भाषा शिकण्याचा प्रयत्न करतात. अगदी श्रीमंत कुळात जन्माला आले आहेत तरीही त्यांची गरीबांशी नाळ जोडलेली आहे ते त्यांच्या भाषेत संवाद साधतात. ज्यावेळी तुम्ही अशा प्रकारे लोकांमधील मानसिक अंतर वाढविण्याचा प्रयत्न तेव्हा लोकांपासून दुर जाता.

हेमंत देसाई, ज्येष्ठ पत्रकार

### अमित शहा यांना आव्हान दिले पाहिजे

अमित शहा महाराष्ट्रात येऊन सांगतात की शरद पवार यांनी काय केले ? त्यांना मराठी माणसाने सभेतून आव्हान दिले पाहिजे. शरद पवार यांनी काय काय केले ते सांगितले पाहिजे. शरद पवार यांनी काही केले नाही, काँग्रेसने काही केले नाही, मग तुम्ही काय केले आहे ? तुम्ही इतके खोटे बोलताय तितके खोटे कोणीच बोलले नसल्याचे देसाई यांनी सांगितले.

### धर्म, जातीमध्ये भांडणे लावण्याचे काम

काँग्रेसचा जाहिरनामा म्हणजे मुस्लिम लिगचा जाहिरनामा आहे असे म्हणणे हे लांच्छनास्पद आहे. देवेंद्र फडणवीस यांनी २०१९ साली जैश ए महंमदचा जाहिरनामा म्हणजे काँग्रेस आघाडीचा जाहिरनामा आहे असे म्हटले होते. जैश ए महंमद ही दहशतवादी संघटना आहे. अशा प्रकारे आपल्या विरोधकांची पाकीस्तानशी तुलना करणे, धर्म आणि जातीमध्ये भांडण लावणे हे आज केले जात असल्याबद्दल देसाई यांनी खंत व्यक्त केली.

### विरोधीपक्षनेता सत्तेत सहभागी होण्याची परंपरा

आज या जिल्हयातील जे नेते आहेत ते पुर्वी विरोधी पक्ष नेते होते. विरोधीपक्ष नेते सत्तेमध्ये सहभागी होणे ही आपली परंपरा निर्माण झाली आहे. राधाकृष्ण विखे यांच्याबरोबरच एकनाथ शिंदे हे विरोधी पक्ष नेते होते. अजितदादा पवार हे विरोधी पक्ष नेते होते असे आपल्याला सांगावे लागते. विरोधी पक्ष नेते म्हणून त्यांनी कशा प्रकारचे काम केले हे आपल्याला माहीती असल्याचे देसाई म्हणाले.

### त्यांना सत्तेतून प्रतिष्ठा हवी आहे !

प्रत्येक गावात जाऊन समस्या जाणून घेत आहे. निवडूण येणे सोपे आहे मात्र त्यानंतर विकास कामे मार्गी लावणे ही परीक्षा आहे. ज्यांना २०१९ मध्ये ज्यांना तुम्ही खासदार म्हणून पाठविले ते पाच वर्षे तुमच्याकडे फिरकलेही नाहीत. माझ्या मतदारसंघात कोणत्या रस्त्याला खड्डा आहे, कुठे बंधाऱ्याची आवश्यकता आहे याची माहीती माझ्या डोळ्यापुढे असते. त्यांना सत्तेतून फक्त प्रतिष्ठा हवी आहे. माझ्या मते सत्तेचा उपयोग सर्वसामान्य जनतेसाठी झाला पाहिजे असे नीलेश लंके यांनी यावेळी सांगितले.

### शेतकऱ्यांची बाजू मांडणारांच्या मागे मतदार

माझ्या मते आज महाराष्ट्रात आणि देशामध्ये मुख्य प्रश्न हा शेतकऱ्यांचा प्रश्न आहे. शेतकऱ्यांचा प्रश्न जो सोडवेल, ज्या प्रकारच्या गॅरंटीज काँग्रेस आणि शरद पवार यांनी दिलेल्या आहेत. या या गोष्टी करू अशी जो हमी देतो त्यांच्याच बाजूने सामान्य माणूस राहिल असे देसाई यांनी सांगितले.

### ते मयत, दहावे, लग्न करू लागले !

त्यांच्याकडे चार दोन डफडयावाले प्रत्येक तालुक्यात आहेत. त्यांच्यासारखेच ते निवडणूक जवळ आली की ते देखील मयत, दहावे, लग्न समारंभ करू लागले आहेत. साहेब आले, दादा आले, वाजवा असे सांगत आहेत. आरे सामान्य लोकांसाठी काय असा सवाल लंके यांनी केला.

### दोन हजार कोटींची विकास कामे

काम करण्याची जिद्द, चिकाटी असेल तर कसे काम उभे राहते ते पारनेर-नगर मतदारसंघात पहा. मागील पंचविस वर्षाचा विकास व गेल्या साडेचार वर्षांचा विकास याची तुलना करा. तुम्हाला फरक कळेल. मतदारसंघाच्या विकासासाठी मी आहोरात्र परिश्रम घेतले. सुमारे दोन हजार कोटी रूपयांची कामे मार्गी लावली. प्रतिष्ठेसाठी, मोठेपणासाठी नाही तर सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी पदाचा वापर केला पाहिजे या भूमिकेतून मी काम करतो. तुम्ही एकदाच संधी द्या, तुम्हाला अभिमान वाटेल असे काम करून दाखविल अशी ग्वाही त्यांनी लंके यांनी दिली.

### मदांध सत्तेचा पराभव होणार !

नगर दक्षिणचे लोकसभा उमेदवार आणि विद्यमान आमदार नीलेश लंके यांच्यासमवेत आज नगर जिल्हयात त्यांच्या जनसंवाद यात्रेत दिवसभर सामील झालो होतो. दोन ठिकाणी मी भाषणेही केली. या यात्रेला मिळणारा उस्फुर्त प्रतिसाद पाहता लंकेंवरील सामान्य जनतेचे प्रेम पाहता खासदार डॉक्टर सुजय विखे पाटील यांच्या मदांध सत्तेचा पराभव होणार अशीच चिन्हे दिसत आहेत. एका उन्मत्त सत्तेला एक फाटका माणूस जबरी आव्हान देत आहे आणि लोकांनी ही निवडणूक हातात घेऊन विखे कुटूंबाचा पराभव करण्याचा निर्धार केला आहे. असेच एकूण चित्र आहे.

हेमंत देसाई, ज्येष्ठ पत्रकार
(देसाई यांच्या फेसबुक वॉलवरून साभार)

## शनिवार नव्हे अपघातवार

### ■ पारनेर तालुक्यातील वेगवेगळ्या अपघातात दोन चिमुरड्यांसह तीन ठार, सहा जखमी ■ नगर-कल्याण व नगर -पुणे महामार्ग बनले आहेत मृत्यूचे सापळे

पारनेर : प्रतिनिधी




**नगर -कल्याण रस्त्यावर कर्जुले हर्या शिवारातील कोकाटे वस्तीजवळ आज, पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास झालेल्या अपघातात ८ वर्षांची चिमुरडी जागीच ठार झाली तर इतर तीन जण गंभीर जखमी झाले.हे सर्वजण एकाच कुटुंबातील आहेत.नगर-पुणे रस्त्यावर आज दुपारी चार वाजण्याच्या सुमारास, आयशर कंपनीचा टेंम्पो दुभाजक ओलांडून विरूद्ध दिशेने चाललेल्या कारवर आदळल्याने झालेल्या दुसऱ्या भिषण अपघातात पाच वर्षांच्या चिमुरडीसह दोन जण जागीच ठार झाले.दोन्ही अपघात चालकांचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने झाले आहेत.**

नगर-कल्याण मार्गावर कर्जुले हर्या शिवारातील कोकाटे वस्ती जवळ मालवाहू छोटा टेम्पो झाडावर धडकून झालेल्या अपघातात ८ वर्षांची चिमुरडी जागीच ठार झाली.या अपघातात टेम्पोच्या चालकासह तिघे जण जखमी झाले.आज, शनिवारी पहाटे साडेपाच वाजता हा दुर्दैवी अपघात झाला.देविका अनिल फुलमाळी (वय ८ ) असे ठार झालेल्या चिमुरडीचे नाव आहे.तर वाहनाचे चालक व देविकाचे वडील अनिल रामा फुलमाळी, आई अनिता रामा फुलमाळी व भाऊ रूद्राक्ष अनिल फुलमाळी (सर्व राहणार निरगुडी, पाटोदा, बीड) असे तिघेजण गंभीर जखमी झाले.

पहाटेच्या वेळी डुलकी लागल्याने अनिल फुलमाळी यांचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने वाहन रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर वेगात धडकून उलटल्याने वाहनाबाहेर फेकल्या गेलेल्या देविकाच्या डोक्याला जबर मार लागल्याने ती जागीच ठार झाली.जखमींना नगर येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

अपघातग्रस्त फुलमाळी कुटुंबीय दोन दिवसांपूर्वी आपल्या मालकीच्या मालवाहू टेंम्पोतून (क्रमांक एमएच १२ केपी ८२९४ ) खोपोली येथील यात्रेत खेळणी व इतर संसारोपयोगी साहित्य विक्रीसाठी गेले होते.आज, शनिवारी ते आपल्या गावाकडे, निरगुडी येथे निघाले होते.मात्र पहाटेच्या वेळी झोप अनावर झालेल्या अनिल फुलमाळी यांना डुलकी लागली आणि त्यांचे

उर्वरीत पान ३ वर

### चार दिवसात दुसरा अपघात

कर्जुले हर्या शिवारात आज झालेल्या अपघाताच्या ठिकाणापासून अवघ्या काही फुटांच्या अंतरावर चार दिवसांपूर्वी, ९ एप्रिल रोजी झालेल्या कार अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला.रस्त्याच्या वळणावर असलेला खड्डा चुकवण्याच्या प्रयत्नात कार उलटल्याने हा अपघात झाल्याचे पोलिसांनी सांगितले.अपघातात सोनाली रेवणानाथ पाटील (वय ४१, कोळीवाडा पाडा, टिटवाळा, कल्याण) या जागीच ठार झाल्या.तर इतर चार जण गंभीर जखमी झाल

## लिंपणगांवमधील त्या वादाशी लंकेंचा काय संबंध?

### ■ जगताप, भोस, शेलार, पाचपुते यांचा सवाल ■ तो वाद स्थानिक तरूणांचा

श्रीगोंदे : विशेष प्रतिनिधी



**नीलेश लंके यांच्या जनसंवाद यात्रा लिंपणगांव येथे पोहचल्यानंतर लंके तसेच इतरांनी उपस्थितांशी संवाद साधला. त्यानंतर तिथे आयोजित करण्यात आलेला जेवणाचा कार्यक्रम उरकत येत असताना तरूणांच्या दोन गटामध्ये स्थानिक प्रश्नावरून वाद झाला. त्या वादाशी लंके यांचा काडीचाही संबंध नसल्याचे मा. आ. राहुल जगताप, बाबासाहेब भोस, घनश्याम शेलार व साजन पाचपुते यांनी सांगितले.**

शुक्रवारी दुपारी हा वाद झाल्यानंतर या वादाचे व्हिडीओ व्हायरल करून लंके यांना सभा न घेताच लिंपणगांवमधून काढता पाय घ्यावा लागल्याच्या खोटया बातम्या विरोधकांकडून जाणीवपुर्वक पसरविण्यात आल्या. त्यात काहीही तथ्य नसल्याचे सांगण्यात आले. लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर नीलेश लंके यांनी १ एप्रिलपासून मतदारसंघात स्वाभीमान जनसंवाद यात्रा सुरू केली असून मोहटादेवी गटावरून सुरू झालेल्या या यात्रेस तालुक्या तालुक्यांमध्ये उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. तसाच प्रतिसाद श्रीगोंदे तालुक्यातील गावागावांमध्येही मिळत आहे. हा प्रतिसाद पाहून विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली असून लंके यांची ही यात्रा बदनाम करण्यासाठी अशा प्रकारचे षडयंत्र रचले जात असल्याचे सांगण्यात आले.

तिसगांव येथे आ. नीलेश लंके हे व्यापारी तसेच सामान्य माणसांच्या गाठी भेटी घेत असतानाचा व्हीडीओ व्हायरल करून लंके यांच्या कॉर्नर सभेला गर्दी न जमल्याने कार्यकर्त्यांवर संताप व्यक्त करून ते निघून गेल्याच्या खोटया बातम्या पसरविण्यात आल्या. त्यानंतर मात्र तिसगांवचे सरपंच तसेच इतर ज्येष्ठांनी खुलासा केल्यानंतर विरोधक चांगलेच तोंडघशी पडले. या अपमानाचा बदला लंके यांना सत्तर टक्के मते देऊन घेणार असल्याची प्रतिज्ञा तिसगांवकरांनी घेतली ही घटनाही ताजी असताना विरोधकांनी लंके यांना बदमान करण्यासाठी ही दुसरी चाल खेळली तिलाही यश आले नसल्याचे जगताप, भोस, शेलार, पाचपुते यांनी सांगितले.

## काळे कुटूंबियांचे राणीताई लंके यांच्याकडून सांत्वन

### मांजरीला वाचविताना पाच जणांचा झाला होता मृत्यू



■ वाकडी येथील काळे कुटूंबियांचे राणीताई लंके यांनी सांत्वन केले.

नेवासा : प्रतिनिधी

**मांजरीला वाचविण्यासाठी गेलेल्या पाच जणांचा मंगळवारी दुर्देवी मृत्यू झाला. काळे कुटूंबातील चार जणांचा त्यात समावेश आहे. शनिवारी मा. आ. नीलेश लंके यांच्या पत्नी राणीताई लंके यांनी वाकडी येथे जाऊन काळे कुटूंबियांचे सांत्वन केले.**

नेवासे तालुक्यातील वाकडी येथे मांजरीला वाचविण्यासाठी गेलेले सहा जण बायोगॅसच्या खडयात बुडूले होते. बायोगॅसच्या खडडयात मांजर पडल्याने तीला वाचविण्यासाठी एकजण खड्ड्यात उतरला होता. तोही बुडू लागल्याने इतर पाच जणही खाली उतरले मात्र ते ही बुडाले. त्यापैकी एका खड्ड्याबाहेर काढण्यात नागरीकांना यश आले होते. एकाच कुटूंबातील चार जण व त्यांचा एक शेजारी पाच जणांचा या दुर्घटनेत मृत्यू झाला. विशाल उर्फ बबलू काळे, अनिल काळे, माणिक काळे, संदीप काळे, बाबासाहेब गायकवाड यांचा मृत्यू झाला तर विजय काळे यांच्यावर रूग्णालयात

उर्वरीत पान ३ वर

## ही निवडणूक फक्त विकासाच्या मुद्यांची

### ■ डॉ. सुजय विखे पाटील यांचे प्रतिपादन ■ विरोधक विरोधासाठी एकत्र आल्याचा आरोप



वडगांव सावताळ : प्रतिनिधी

**येत्या १३ मे रोजी होणारी लोकसभेची निवडणूक फक्त विकासाच्या मुद्दांची असल्याचे सांगतानाच या निवडणूकीसाठी केवळ विरोधासाठीच काहीजण एकत्र आल्याचा आरोप खा. डॉ. सुजय विखे यांनी केला.**

तालुक्यातील वडगांव सावताळ येथे भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि बुथ प्रमुखांच्या संवाद कार्यक्रमात डॉ. विखे हे बोलत होते. ज्येष्ठ नेते सिताराम खिलारी, जिल्हा परिषदेच्या बांधकाम व कृषी समितीचे मा. सभापती काशिनाथ दाते, भाजपाच्या प्रदेश कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे, भाजपा तालुकाध्यक्ष राहुल शिंदे आदी यावेळी उपस्थित होते.


यावेळी बोलताना ज्यांचे नेतृत्व घेऊन समोरचे उमेदवार उभे आहेत त्यांनी जिल्हयासाठी काय केले असा प्रश्न उपस्थित करीत अनेक वर्षे राज्यात मुख्यमंत्री आणि केंद्रात मंत्रीपद भोगणारांनी जिल्हयाच्या विकासासाठी कोणतेही योगदान दिले नाही. संरक्षणमंत्री असताना के.के. रेंजचा प्रश्न सोडविला नाही. जिल्हयातील माजी महसूलमंत्र्यांनीही के.के.रेंजच्या जमिनीबाबत ठाम भुमिका घेतली नाही. मात्र राधाकृष्ण विखे हे महसूलमंत्री झाल्यानंतर के.के. रेंजला जमीन देणार नाही असे ठामपणे लिहून दिले. त्यामुळेच शेतकऱ्यांच्या जमिनींना संरक्षण मिळू शकले असा दावा त्यांनी केला.

यावेळी बोलताना डॉ. विखे पुढे म्हणाले, देशात पुन्हा भाजपा आणि मित्र पक्षांचे सरकार सत्तेवर येणार आहे. ज्यांनी राज्यात फक्त दहा उमेदवार दिले आहेत असे ज्येष्ठ नेते मोठमोठी स्वप्ने पाहत आहेत. ज्यांच्या मतदारसंघातील साठ टक्के निधी परत गेला अशा खासदारांना संसदरत्न पुरस्कार मिळतो हे आश्चर्यकारक असल्याचे सांगत विखे यांनी सुप्रिया सुळे व डॉ. अमोल कोल्हे यांनाही टोला लगावला.

मागील पाच वर्षात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या प्रत्येक योजनेचा लाभ मी सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे आशिर्वाद माझ्या पाठीशी खंबीरपणे आहेत. कोणी कितीही धमक्या दिल्या तरी मी त्यास घाबरत नाही. या तालुक्यातील जनताच या धमक्यांना उत्तर देईल असेही डॉ. विखे यांनी सांगितले.

## गावठी कट्ट्यासह तिघे जेरबंद

### एलसीबी, पारनेर पोलीसांची संयुक्त कारवाई



पारनेर : प्रतिनिधी

**पुण्याकडून नगरकडे जाणाऱ्या स्विफ्ट कारमधून गावठी कट्टा, दोन जिवंत काडतुसांसह तिघांना स्थानिक गुन्हे शाखा व पारनेर पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने नगर-पुणे महामार्गावरील गव्हाणवाडी फाटा येथे जेरंबद केले.**

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर कायदा व सुव्यस्थेच्या दृष्टीने करण्यात आलेल्या पार्श्वभुमीवर ही कारवाई करण्यात आली.पोलीस अधीक्षक राकेश ओला, नगरचे अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, नगर ग्रामीण विभागाचे उपविभागिय पोलीस अधिकारी संपत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली नगरच्या स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या सुचनेनुसार उपनिरीक्षक सोपान गोरे, पो. कॉ.भाऊसाहेब काळे, दत्तात्रेय हिंगडे, रविंद्र कर्डीले, अतुल लोटके, देवेंद्र शेलार, संतोष खैरे, विजय ठोंबरे, बाळासाहेब गुंजाळ यांच्या टिमने ही कारवाई केली.

स्थानिक गुन्हे शाखेचे सहाययक पोलीस निरीक्षक खंडागळे यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार गुन्हे शाखेच्या पथकाने पारनेर पोलीस ठाण्याचे गहिनीनाथ यादव, विवेक दळवी, मयुर तोरडमल यांच्यासह पंचांना सोबत घेत नगर-पुणे महामार्गावर सापळा लावला होता. गुप्त

उर्वरीत पान ३ वर

# तंत्रमंत्र
विज्ञानयुगातील बितंबातम्या

## UPI App द्वारे सुरक्षित व्यवहारासाठी लक्षात ठेवा 'या' पाच गोष्टी!

**सध्याच्या काळात डिजिटल पेमेंट करण्याचे प्रमाण वाढले आहे. हल्ली प्रत्येकजण जवळ कॅश बाळगण्यापेक्षा ऑनलाईन पेमेंटच करताना दिसून येतो. प्रत्येकजण हल्ली यूपीआयचा वापर करतो. आपल्या फोनमध्ये यासाठी गुगल पे, फोन पे, पेटीएम आणि अन्य ॲप्स असतात. ज्यामधून आपण ऑनलाइन व्यवहार करतो. यूपीआय पेमेंट ही इतर कोणत्याही ऑनलाइन पेमेंट पद्धतीपेक्षा वेगवान आहेत. मात्र जस जसे ऑनलाइन पेमेंटचे प्रमाण वाढले आहे तशी ऑनलाइन फसवणूक करण्याचे प्रमाणदेखील वाढले आहे. ऑनलाईम पेमेंट करणाऱ्यांची फसवणूक करून त्यांचे पैसे चोरण्यासाठी सायबर गुन्हेगार नवनवीन युक्त्या लढवत असतात. त्यामुळेच यूपीआय पेमेंट करत असताना काही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे. ऑनलाइन पेमेंट करताना कोणत्या प्रकारची काळजी घेतली पाहिजे त्याबद्दल जाणून घेऊयात...**

### विश्वसनीय UPI Apps चा वापर

सध्या ऑनलाइन व्यवहार करण्यासाठी अनेक upi apps उपलब्ध आहेत. त्यामुळे आपण ऑनलाइन पेमेंटसाठी अधिकृत व सुरक्षित यूपीआय App वापरणे आवश्यक असते. लोकप्रिय व सुरक्षित Apps मध्ये सध्या Google Pay, PhonePe आणि Paytm यांचा समावेश आहे. या या ॲप्सना सर्व प्रमुख बँका आणि वित्तीय संस्थांचा पाठिंबा आहे. त्यामुळे तुमचे पैसे सुरक्षित असल्याचा विश्वास तुम्हाला वाटतो.

### UPI पिन कोणालाही सांगू नये

तुमचा upi पिन हा तुमचे पैसे अधिक सुरक्षित ठेवण्यास मदत करतो. त्यामुळे तुमचा पिन सुरक्षित असणे आवश्यक आहे. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे तुमचा upi पिन कोणाशीही शेअर करू नये. तसेच एखादी वेबसाइट तुम्हाला अधिकृत वाटत नसेल तर तिथे तुमचा पिन टाकू नये. तसेच तुम्ही तुमचा पिन हा काही कालावधीनंतर बदलत राहणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारचे ऑनलाईन पेमेंट करत असताना प्राप्तकर्त्यांच्या डिटेल्सची नीट खात्री करणे आवश्यक आहे. यामध्ये प्राप्तकर्त्याचे नाव , UPI आयडी आणि मोबाईल नंबर याचा समावेश होतो. तुम्ही पेमेंट करण्याआधी UPI App वर 'व्हेरिफाय पेमेंट ॲड्रेस' फीचरचा वापर करून प्राप्तकर्त्याची ओळख देखील करू शकता.

### आपले डिव्हाईस सुरक्षित ठेवावे

तुमचे डिव्हाईस हॅकर्स कधीही हॅक करू शकतात. तसे होऊ नये म्हणून सुरक्षेसाठी अँटीव्हायरस किंवा तुमची ऑपरेटिंग सिस्टीम आणि Apps कायम अपडेट ठेवावेत. जेणेकरून तुमचे डिव्हाईस सुरक्षित राहू शकते. तसेच प्रत्येकजण हल्ली सुरक्षेच्या दृष्टीने आपल्या डिव्हाईसला पासवर्ड ठेवत असतो. तो पासवर्ड अधिक स्ट्राँग असणे आवश्यक असते. जेणेकरून तुमचे डिव्हाईस अधिक सुरक्षित राहील.




**एखाद्याला तत्काळ पैसे पाठविणे, वीजबिल भरणे, सिलिंडर बुक करणे आदी अनेक गोष्टींसाठी वापरले जाणारे सर्वांत लोकप्रिय ॲप म्हणजे 'गूगल पे' (Google Pay). अगदी रिक्षात, भाजीविक्रेत्यांकडे ते मॉलमधील प्रत्येक दुकानामध्ये गूगल पे ॲपचा क्यूआर कोड बोर्ड लावलेला तुम्हाला दिसून येईल. अलीकडच्या काळात डिजिटल पेमेंटचा वापर इतका वाढला आहे की, प्रत्येक जण लहान लहान व्यवहार करण्यासाठीही गूगल पे या ॲपचा वापर करताना दिसून येत आहे. त्यामुळे जरी आपण पाकीट घरी विसरलो तरी मोबाईलमध्ये गूगल पे ॲप असले तर कोणालाही चिंता करण्याची गरज भासत नाही. कारण या ॲपमुळे तुम्ही कधीही, कुठेही व कोणत्याही वेळी झटपट व्यवहार करू शकता. पण, तुम्ही कधी विचार केला आहे की, हे 'गूगल पे' ॲप लाँच करण्याची मूळ कल्पना कोणाची असेल? हे ॲप भारतात कधी लाँच झाले असेल? तर आपण याविषयी अधिक जाणून घेणार आहोत...**


## जाणून घेऊ 'गूगल पे'बद्दल सर्वकाही...

'गूगल पे' ॲपची स्थापना २६ मे २०११ रोजी झाली. अगदी सुरुवातीला या डिजिटल पेमेंट प्लॅटफॉर्मचे नाव बदलून ११ सप्टेंबर २०१५ रोजी 'ॲण्ड्रॉइड पे' ठेवण्यात आले. त्यानंतर २८ ऑगस्ट २०१८ रोजी 'गूगल पे' या नावाने लाँच होण्यापूर्वी हे ॲप 'तेज' (Tez) या नावानेसुद्धा लाँच करण्यात आले होते. गूगलद्वारे विकसित करण्यात आलेली गूगल पे ही सेवा डिजिटल वॉलेट कम ऑनलाइन पेमेंट प्रणाली म्हणून काम करते. हे ॲप वापरकर्त्यांना ॲण्ड्रॉइड फोन, स्मार्टवॉच व टॅबलेटद्वारे ऑनलाइन पेमेंट, खरेदी, तर विविध बँकांद्वारे लोन काढण्यासाठीसुद्धा परवानगी देते. आयओएस (IOS) हे आणखी एक प्लॅटफॉर्म आहे; जे भारत आणि युनायटेड स्टेट्समध्ये काही अटींसह वापरकर्त्यांना गूगल पे वापरण्याची परवानगी देतो.



### 'गूगल पे' ची कामगिरी

- गूगलच्या डिजिटल पेमेंट प्लॅटफॉर्म गूगल पेने भारतात पदार्पण केल्यापासून अवघ्या दोन वर्षांत ६७ मिलियन ॲक्टिव्ह युजर्स गाठले.
- गूगल पेने २०१९ मध्ये डिजिटल व्यवहारांमध्ये ५९ टक्के योगदान दिले होते.
- फोन पेनंतर गुगल पे हे दुसरे सर्वात लोकप्रिय यूपीआय प्लॅटफॉर्म आहे.




### बँक खाते गूगल पेवर कसे जोडायचे?

- स्क्रीनच्या वरच्या उजव्या कोपऱ्यात प्रोफाइल आयकॉनवर टॅप करून, गूगल पे खात्याचा तपशील उघडा.
- तुमचे बँक खाते जोडण्यासाठी 'पैसे पाठवा'वर टॅप करा.
- तुमच्या बँकेचे नाव शोधा आणि ओपन करा.
- तुमच्या बँक खात्याशी संबंधित तुमचे सिम कार्ड निवडा.
- तुमच्या बँक तपशिलांची पडताळणी करण्यासाठी गूगल पे तुमच्या निवडलेल्या सिम कार्डवरून एक समर्पित एसएमएस पाठवेल आणि व्यवहार करण्यासाठी ते प्राथमिक बँक खाते म्हणून सेट करील.
- तुम्ही गूगल पेमध्ये एकापेक्षा जास्त बँक खाती जोडू शकता आणि व्यवहार करण्यासाठी खाते स्विचसुद्धा करू शकता.

### गूगल ॲपचा शोध कोणी लावला?

- गूगल पे ॲपचा शोध सुजित नारायणन आणि सुमित ग्वालानी यांनी लावला. गूगल पे ॲपचे सह-संस्थापक सुजित नारायणन यांच्या म्हणण्यानुसार, 'गूगल तेज'वर काम करताना त्यांना आणि त्यांच्या टीमला असे जाणवले की, ग्राहकाचा आर्थिक प्रवास डिजिटल पेमेंटच्या पलीकडे आहे. त्यामुळे ही बाब लक्षात घेता, भारतातील वापरकर्त्यांना पैशांची देवाणघेवाण करण्यासाठी किंवा हाताळण्यासाठी एक नवीन, जलद व कार्यक्षम मार्ग प्रदान करणे अत्यंत गरजेचे आहे. तेव्हा या संस्थापक जोडीने 'गूगल पे' नावाने ॲप लाँच करण्याचा निर्णय घेतला; जे वापरकर्त्यांना हजारो वर्षांसाठी आर्थिक सेवा पुरवेल.
- सुजित नारायणन : सुजित नारायणन आणि सुमित ग्वालानी हे गूगल पेचे सहनिर्माते आहेत. सुजित हे अनुभवी पेमेंट्स एक्झिक्युटिव्ह आहेत आणि त्यांना वित्तीय सेवा क्षेत्रांचा अनुभव आहे. सुजित हे वाराणसी येथील कालिकत आणि महात्मा गांधी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांनी स्टॅण्डर्ड चार्टर्ड बँकेतून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. सुजित यांनी सात वर्षांनंतर संस्थेच्या राष्ट्रीय विक्री व्यवस्थापकीय पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर गूगल कंपनीत प्रवेश करण्यापूर्वी ते रेलिगेअर मॅक्वेरी प्रायव्हेट वेल्थचे उपाध्यक्ष होते. त्यांनी मार्केटिंग आणि चॅनेल डेव्हलपमेंटमध्येही काम केले आहे.
- सुमित ग्वालानी : गूगल पेचे सह-संस्थापक सुजित नारायणन यांच्याबरोबर सुमित ग्वालानी यांची हे ॲप सुरू करण्यात महत्त्वाची भूमिका आहे. त्यांनी गूगल तेजचे भारतातील कामकाज हाताळले. सुमित यांनी गूगल कंपनीमध्ये १२ वर्षांपेक्षा अधिक काळ काम केले आहे. गूगल कंपनीमध्ये प्रवेश करण्यापूर्वी कोलंबिया विद्यापीठ, सांता बार्बरा येथे ते संशोधन सहायक होते. सुमित ग्वालानी हे मुंबई विद्यापीठात कम्प्युटर इंजिनियरिंगचे विद्यार्थी होते. सांता बार्बरा या विद्यापीठातून त्यांनी संगणक विज्ञान विषयात पदव्युत्तर शिक्षण घेण्यापूर्वी बी.टेक. पदवी पूर्ण केली.

### गूगल पे हे ॲप इतर ऑनलाइन पेमेंट ॲपच्या तुलनेत अधिक का वापरले जाते?



इकॉनॉमिक्स टाइम्स यांनी दिलेल्या माहितीनुसार या ॲपमध्ये वापरकर्त्यांसाठी सोईस्कर अशी अनेक फीचर्स आहेत. व्यवहार झटपट होतात. पैसे थेट बँक खात्यात पाठविले आणि प्राप्त केले जाऊ शकतात. या ॲपद्वारे लहान वा मोठे सर्व व्यवहार करता येतात. गूगल पे ॲप आठ भारतीय भाषांमध्ये उपलब्ध आहे. ॲप वापरकर्त्यांना एकापेक्षा अधिक पेमेंट पर्यायदेखील प्रदान करते. याचा अर्थ वापरकर्ते त्यांच्या मोबाइल नंबरद्वारे किंवा व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस (VPAs)द्वारे व्यवहार करू शकतात. वापरकर्त्यांचे सगळ्यात आवडते फीचर म्हणजे 'स्क्रॅच कार्ड'. गूगल पे विविध व्यवहारांवर आकर्षक कॅशबॅक आणि ऑफर प्रदान करते. हे कॅशबॅक थेट लिंक केलेल्या बँक खात्यात जमा होतात. गूगल पेच्या सर्व खास वैशिष्ट्यांमुळे ऑनलाइन व्यवहारांसाठी वापरले जाणारे गूगल पे हे लोकप्रिय ॲप आज प्रत्येक भारतीयाच्या मोबाईलमध्ये दिसू लागले आहे.

### गूगल पे : नाव, लोगो अन् टॅगलाइन...

सुरुवातीला या ॲपचे नाव गूगल पे ( Google pay ) असे होते आणि ॲपच्या लोगोची डिझाइन एका बाजूला गूगलचा (Google) 'जी' (G); तर दुसऱ्या बाजूला 'पे' (Pay), असे इंग्रजी मजकुरात लिहिण्यात आले होते. त्यानंतर काही वर्षांनी या ॲपचे नाव बदलून 'जी पे' (G Pay); तर लोगो बदलून 'जी' व 'यू' G आणि U इंटरलॉक करण्यात आला आहे. तसेच यामध्ये लाल, पिवळा, हिरवा व निळा हे रंग लोगोसाठी वापरण्यात आले आहेत. 'मनी मेड सिंपल' ही गूगल पेची टॅगलाईन आहे. म्हणजेच गूगल पे वापरकर्त्यांचा पैशांची देवाणघेवाण करण्याचा मार्ग अधिक सोपा करते.

### 'गुगल पे'ची आव्हाने...

जगातील सर्वात मोठ्या संस्थांपैकी एक असणाऱ्या गूगल कंपनीच्या पाठिंब्यामुळे गूगल पेची सुरुवात करताना छोट्या-उद्योजकांना आणि स्टार्टअप्सना ज्या समस्यांना सामोरे जावे लागते त्या समस्यांना या संस्थापक जोडीला तोंड द्यावे लागले नाही. कोणत्याही साधनांची कमतरताही भासली नाही. अगदी कोणत्याही आव्हानांना सामोरे जावे लागले नसले तरी २०२० मध्ये गूगल पेच्या ॲपवरील तांत्रिक बिघाड हा काही काळासाठी ट्रेंडिंग विषय ठरला होता. अनेक वापरकर्त्यांनी गूगल पे ॲपची तक्रारदेखील नोंदवली होती. प्रकरण असे होते की, काही गूगल पे युजर्सची बँक खाती कोणतीही सूचना न देता गूगल पेवरून काढून टाकण्यात आली होती. या प्रकरणाच्या तक्रारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर वारंवार पोस्ट केल्या जात होत्या. याप्रसंगी गूगल पे टीमने सुचवले की, ॲपवर बँक खाती लिंक करताना वापरकर्त्यांबरोबर नकळत झालेली एखादी कृती असू शकते. गूगल पे टीमने यावर उपाय शोधून काढला आणि परिस्थिती पूर्ववत झाली.



## इलेक्ट्रिक बाइक आणि स्कूटरमध्ये या पाच कारणांमुळे लागते आग, तुम्हीही घ्या काळजी...

**देशात एका बाजूला इलेक्ट्रिक वाहनांसाठी मागणी वाढत आहे, तर दुसऱ्या बाजूला इलेक्ट्रिक वाहनांमध्ये लागणाऱ्या आगीच्या घटना हे सरकार आणि वाहन उत्पादक कंपन्यांसमोरचं मोठं आव्हान आहे. छत्रपती संभाजीनगरात इलेक्ट्रिक स्कूटरला चार्जिंग करताना आग लागून इमारतीत पसरली. यात ७ जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर पुन्हा इलेक्ट्रिक वाहनांमध्ये आग लागणं, बॅटरीचा स्फोट होणे या कारणांची चर्चा होत आहे. नागरिक इलेक्ट्रिक वाहन खरेदी करावं की करू नये याबाबत संभ्रमावस्थेत आहेत...**

- शॉर्ट सर्किट : इलेक्ट्रिक वाहनांना आग लागण्याची अनेक कारणं आहेत. आम्ही तुम्हाला अशी पाच कारणं सांगणार आहोत ज्यामुळे ईव्हीला आग लागू शकते. चार्जिंग स्टेशनवर वाहन चार्जिंगला लावलेलं असताना आग लागण्याच्या घटनांमध्ये बाइक आणि स्कूटींमध्ये शॉर्ट सर्किट होणं हे सर्वात मोठं कारण आहे. जर बॅटरीचा जॉइंट टाईट नसेल तर शॉर्ट सर्किटची शक्यता वाढते. इलेक्ट्रिक टू व्हीलरमध्ये, सात किलोवॅटपर्यंतचे चार्जर वापरले जातात. हे चार्जर कधीकधी इतके पॉवरफुल ठरतात की त्यांच्या वापरामुळे बॅटरीमध्ये शॉर्ट सर्किट होण्याची शक्यता निर्माण होते.
- तापमानामुळे बॅटरी गरम होणे : भारतातल्या अनेक भागांमध्ये खूप गर्मी असते. अनेक राज्य आणि शहरांमध्ये कमाल तापमान हे ३४ अंश सेल्सिअसच्या पुढे जातं. यामुळे दुचाकी वाहनांसमोर काही अडचणी निर्माण होतात. बहुतांश दुचाकींमध्ये बॅटरी ही सीटच्या खाली असते आणि गर्मीमध्ये उन्हात वाहन उभ करणं ही खूप मोठी जोखीम ठरू शकते. उन्हात दुचाकी उभी केल्याने बॅटरी खूप गरम होते. अशातच तुम्ही दुचाकी सुरू केली तर किंवा चार्जिंगला लावली तर बॅटरीचा स्फोट होण्याची किंवा बॅटरी पेटण्याची शक्यता वाढते.



- बॅटरीचं तापमान वाढणं धोकादायक : इलेक्ट्रिक स्कूटरमध्ये इंधनाच्या जागी वापरलं जाणारं लिथियम आणि सामान्य स्कूटरमध्ये वापरली जाणारं गॅसोलिन हे ज्वलनशील असतं. गॅसोलिन २१० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमानात पेटू शकतं. तर लिथियम १३५ अंश सेल्सिअत तापमानात आग पकडू शकतं. चार्जिंगला लावल्यानंतर बॅटरी तापते, किंवा उन्हात वाहन उभं केल्याने बॅटरी तापते. त्यामुळे तुमच्याकडे इलेक्ट्रिक वाहन असेल तर या वाहनाची काळजी घ्यायला हवी. किमान ही वाहनं दुपारच्या कडक उन्हात उभी करू नयेत.
- कंपन्यांनी हीट सिंकचा वापर कमी करणं : बॅटरीतून मोठ्या प्रमाणात उष्णता बाहेर पडते. त्यामुळे बॅटरीचं कव्हर म्हणजेच बाहेरचं आवरण मजबूत असलं पाहिजे. तसेच या आवरणामध्ये हीट सिंकचा वापर व्हायला हवा. मीडिया रिपोर्ट्सनुसार असं केल्यास बॅटरीचं वजन वाढतं आणि त्यानंतर बॅटरी एका ठिकाणाहून दुसरीकडे नेणं अवघड होतं. त्यामुळे बॅटरीचं वजन कमी ठेवण्यासाठी कंपन्या हीट सिंकचा वापर करत नाहीत, किंवा खूप कमी वापर करतात. स्वॅपेबल बॅटरी बनवताना हे मोठं आव्हान असतं. परिणामी बॅटरीचं तापमान नियंत्रणात राहात नाही.
- दुसऱ्या चार्जरचा वापर : बऱ्याच जणांना माहिती आहे की, एका मोबाईलचा चार्जर दुसऱ्या फोनला वापरू नये. कारण त्यामुळे बॅटरी फुटण्याची शक्यता असते. हाच नियम इलेक्ट्रिक वाहनांना देखील लागू पडतो. आगीच्या अनेक दुर्घटनांमध्ये असं निदर्शनास आलं आहे की इलेक्ट्रिक वाहन चार्ज करण्यासाठी योग्य चार्जरचा वापर केला गेला नव्हता. वाहनांमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या आणि क्षमतेच्या बॅटरींचा वापर केला जातो. या बॅटरी चार्ज करण्यासाठी ठराविक चार्जरचा वापर केला जातो. मात्र तुम्ही दुसऱ्या चार्जरने तुमचं इलेक्ट्रिक वाहन चार्ज करत असाल तर धोका वाढतो.

### घराच्या बाहेर स्वतंत्र सॉकेट करा

सद्यःस्थितीत वाहनांना चार्जिंग करताना वायर लांब नेत घराच्या आत असलेल्या सॉकेटवरच चार्जिंगला लावले जाते. त्यामुळे शॉटसर्किट किंवा बॅटरीचा स्फोट झाल्यास तो थेट घरात पोहचतो. त्यामुळे काही अंशी धोका टाळण्यासाठी चार्जिंगसाठी घराच्या बाहेर मुख्य दरवाजापासून दूर अंतरावर एक वेगळे योग्य पॉवरचे स्वतंत्र सर्किट बसवणे हिताचे ठरते. यामुळे दुर्घटना घडल्यास मोकळ्या जागेत व बाहेरील बाजूला असल्याने घरातील सदस्यांना बाहेर पडणे सोपे जाईल.

## शॉर्ट न्यूज

### भीम गीतावर वातावरण झाले भीममय

■ **नगर :** क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सप्ताह सर्वत्र मोठ्या आनंदात साजरा होत असतो जयंती सप्ता निमित्त दिल्लीगेट येथील नीलक्रांती चौक येथे निल क्रांती मित्र मंडळाच्या वतीने महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायिका सुषमाताई जावळे यांच्या भीम बुद्ध गीताचा गायन कार्यक्रम मोठ्यात जल्लोषपूर्ण वातावरणात घेण्यात आला. क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले.

### कोळसांगवीत तीव्र पाणी टंचाई

■ **पाथर्डी :** तालुक्यातील कोळसांगवी येथे गेल्या महिनाभरापासून तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असुन, सध्या परीक्षेचा काळ चालु आहे. ऐन परीक्षेच्या काळात महिलांना आपल्या मुला, मुलींना घेऊन रखरखत्या ऊन्हात पायपीट करावी लागत आहे. आधी पाणी नंतर परीक्षा अशी परीस्थिती कोळसांगवी येथे निर्माण झाली आहे. येथील सार्वजनिक पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीने अक्षरक्षा तळ गाठला असून विहिरीवरील मोटार फक्त अठरा मिनिटं चालते आहे.

### भाग्यश्री फंड डबल महाराष्ट्र केसरी

■ **श्रीगोंदा :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या महिला कुस्ती अधिवेशनामध्ये इंटरनॅशनल कुस्ती संकुल श्रीगोंदा तालमीच्या वाघिणींची धडाकेबाज कामगिरी करत ४ गोल्ड मेडल, १ सिल्वर मेडल आणि ३ ब्रांझ मेडलची कमाई केली आहे. विशेष म्हणजे महिला महाराष्ट्र केसरीचा मान दुसऱ्यांदा श्रीगोंद्याच्या तालमीला मिळाला आहे. या मल्लांना आमदार बबन पाचपुते, आमदार संग्राम जगताप, डॉ. अरुण आनंदकर, विजय बोरुडे, माजी आ. राहुल जगताप, राजेंद्र नागवडे आदींनी अभिनंदन केले.

### वेटरने ७८ हजार रुपयांचा मुद्देमाल पळवीला

■ **राहुरी :** जोहर शेख हे राहुरी शहरातील हॉटेल राजेश्री परमीट रुम येथे हॉटेल मॅनेजर म्हणून काम पाहतात. ते पहाटे झोपेतुन उठले असता हॉटेलमध्ये चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यावेळी त्यांनी हॉटेल मधील सीसीटिव्ही फुटेज तपासले. तेव्हा मध्यरात्री ३ वाजे दरम्यान हॉटेलमधील वेटर यांनी ड्राव्हरमधील ६२ हजार रुपये रोख रक्कमेसह एकूण ७८ हजार ८० रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेल्याचे दिसून आले. जोहर शहार शेख यांच्या फिर्यादीवरून आरोपी रोजदार शेख व रमजान शेख दोघे रा. वेस्ट बंगाल या दोघांवर चोरीचा गून्हा दाखल करण्यात आला.

### अकोलेत कांदा १६११ रुपये भाव

■ **अकोले :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ५२४७ गोणी कांद्याची आवक झाली. कांद्याला कांदा १६११, तर गोल्टीला १२०० रुपये बाजारभाव मिळाला आहे. तालुक्यातील कांदा पिकांची गुणवत्ता चांगली असल्याने इतर बाजारपेक्षा चांगल्या दराने विक्री होत आहे. त्याचा प्रत्यय गोल्टी बाजारभावामुळे दिसून आला. शेतकऱ्यांना आवाहन केले आहेत, की आपला कांदा आपल्याच बाजार समितीत विक्रीस आणावा. अकोले बाजार आवारात रविवार, मंगळवार, गुरुवार, असे तीन दिवस केला जातो.

# रोजगाराच्या संधी जिल्ह्यात निर्माण करणार

## खा.डॉ. सुजय विखे पाटील यांचे आश्वासन



◣ नगर : प्रतिनिधी

**राज्याच्या राजकारणात महत्वाची भुमिका बजाविणारा जिल्हा म्हणुन पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर नगरकडे पाहिले जाते. जिल्ह्यात आता रोजगाराच्या संधी निर्माण करून देण्यासाठी चांगले उद्योग यावे हाच प्रयत्न राहणार आहे. जिल्ह्यातील तरुणांना जिल्ह्यातच रोजगार निर्माण करून देण्याचे आश्वासन खा.डॉ.सुजय विखे पाटील यांनी दिले.**

निवडणुकीच्या प्रचाराच्या अनुशंगाने पिंपळगाव लांडगा येथे जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजीराव कर्डीले यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात खा.विखे पाटील बोलत होते. ते म्हणाले की, सध्या तरुणांसाठी जिल्ह्याला सर्वात मोठी समस्या रोजगारासाठी बाहेर जावे लागणे ही आहे. यासाठी स्थानिक ठिकाणी रोजगार निर्माण करण्याचे लक्ष ठेऊन मी पहिली निवडणुक लढविली होती. पण कोरोना काळ आणि हप्ता वसूली सरकार असल्याने फारसे प्रयत्न करता आले नाहीत. मात्र मागील दोन वर्षाच्या काळात महायुतीचे सरकार आल्याने जिल्ह्यात औद्योगिक वसाहती उभारण्याचे प्रामाणिक प्रयत्न केले. वडगाव गुप्ता व शिर्डी येथे औद्योगिक वसाहतीला मंजुरी मिळाल्याने तरुणांना रोजगार मिळणार आहे.

श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी येथे शासनाची ६१८ एकर जमीन विनामुल्य मिळवत औद्योगिक वसाहतीचा पाया रचला असून, लवकरच त्यांचे काम सुरू होईल. यामुळे जिह्यात अधिक रोजगार निर्मीती होऊन हजारो तरूणांच्या हाताला काम मिळणार असून त्यांना जिल्ह्यातच राहता येणार आहे. स्थानिक ठिकाणी रोजगाराच्या संधी मिळाल्याने तरुणांचे मनोबल वाढणार आहे. याचा फायदा जिल्ह्याच्या विकासाला होणार असल्याचे मत सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केले.

उद्योग धद्यांसाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून हजारो रुपायाचा निधी मिळवत गावा गावातील रस्ते, महामार्ग, अशी दळण वळणाची साधने उभी केली. एन.एच.आय तर्फे ४ हजार २७७.५० कोटी रुपयांचा निधी मिळवत जिल्ह्यात सुसज्य, जलद अशा रस्त्यांची निर्मीती केली. १४५४ कोटी रुपयांचा निधी मिळवत सहा राष्ट्रीय महामार्गाचा विकास केला. तर गावागावात वाहतुकीच्या सुविधा पोहचाव्यात यासाठी १३६.१३ कोटी रुपयांचा निधी मिळवत २९ गावांत रस्त्यांचे जाळे उभे केले. दळणवळणाची साधने वाढल्याने उद्योजकांसाठी अहमदनगर हे मुंबई, पुणे, नाशिक आणि इतर जिल्ह्यासाठी मध्यवर्ती ठिकाण झाले. यामुळे मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे जिल्ह्यात येणार असून स्थानिकांचा रोजगाचा प्रश्न मार्गी लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# सुनबाई... घरच्या की बाहेरच्या?

## सुप्रिया सुळे-सुनेत्रा पवार यांच्यातील लढाई टोकाला प्रचारादरम्यान शरद पवारांच्या वक्तव्यावरून उठले वादंग

◣ पुणे : प्रतिनिधी



**बारामती लोकसभा मतदारसंघात सुप्रिया सुळे व सुनेत्रा पवार यांच्यातील राजकीय लढाई टोकाला पोहोचली आहे. अजित पवारांनी पत्नी सुनेत्रांसाठी प्रचाराचा धडाका लावला असून भावनिक आवाहनावर त्यांचा जोर आहे. दुसरीकडे शरद पवारांनीही कन्या सुप्रियासाठी प्रतिष्ठा पणाला लावली आहे. मुलीला निवडून द्यायचे की सुनेला याबाबत बारामतीकर संभ्रमात असतानाच शरद पवारांनी लेकीला मूळ पवार व सुनेला 'बाहेरची' संबोधल्याने त्यांच्यावर टीकेची झोड उठली आहे.**

**अजित पवार, ९ एप्रिल २०२४**
तुम्ही इतके दिवस पवार कुटुंबासोबतच आहात, आताही पवार आडनावाच्या पाठीशी उभे राहा. गेल्या तीन वेळा लेकीला निवडून दिले. आता सुनेला निवडून दिले की फिट्टंफाट होईल. चार दिवस सासूचे, तर चार दिवसे सुनचे असतात. सासूचे दिवस संपले आहेत. आता सुनेचे दिवस आहेत.

**शरद पवार, ११ एप्रिल २०२४**
बारामतीत यंदाही पवारांनाच निवडून द्या असे सांगणारे अजित पवार काहीही चुकीचे बोलले नाहीत. फक्त मूळ पवार कोण आणि बाहेरून आलेले पवार कोण हा फरक ओळखा. पूर्वी निवडणुकीवेळी आम्ही सगळे कुटुंबीय लोकांमध्ये जात होतो. आता कामामुळे सर्व बाहेर गेलेले आहेत.

**विरोधी पक्षातील महिलांकडून समाचार**

शरद पवार साहेबांना आपण सगळेच पुरोगामी विचारांचे नेते म्हणून आजपर्यंत ओळखत आलो आहोत. पण गेली ४० वर्षे आपल्याच कुटुंबात वावरणारी मराठवाड्यातल्या पाटलाची लेक ही शरद पवार साहेबांना आता आपली वाटत नाही, यापेक्षा दुसरे दुर्दैव नाही.
**चित्रा वाघ**, भाजप महिला प्रदेशाध्यक्ष

सुनांना लेकीसारखी वागणूक देण्याची परंपरा आहे आमच्या महाराष्ट्रातकदाचित मुलीच्या प्रेमापोटी, राजकारणासाठी तुम्ही तुमचे विचार बदलले बारामतीच्या काकांचं हे वाक्य, महाराष्ट्रातल्या समस्त लग्न करून सासरी गेलेल्या सुनांचा अपमानच आहे.
**शीतल म्हात्रे**, शिंदेसेना

### शनिवार नव्हे अपघातवार

वाहनावरील नियंत्रण सुटले. अपघातानंतर तेथून जाणाऱ्या वाहन चालकाने टाकळी ढोकेश्वर पोलीस दूरक्षेत्रात अपघाताची माहिती कळवली. त्यानंतर घटनास्थळी पोहचलेल्या पोलिसांनी जखमींना उपचारासाठी टाकळी ढोकेश्वर येथील ग्रामीण रुग्णालयात हलवले.तेथील प्राथमिक उपचारानंतर त्यांना नगर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

नगर - पुणे रस्त्यावरील दुसऱ्या घटनेत चालकाचे नियंत्रण सुटल्याने रस्ता दुभाजक ओलांडून विरूद्ध दिशेला गेलेल्या आयशर टेंम्पोने कारला धडक दिल्याने झालेल्या अपघातात पाच वर्षांच्या चिमुरडीसह दोन जण जागीच ठार झाले.

नगर पुणे रस्त्यावर पळवे शिवारात,मठ वस्ती परिसरात, संजिवनी हॉटेल जवळ आज,शनिवारी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास हा विचित्र अपघात घडला.

अपघातासंदर्भात सुपे पोलिसांकडून मिळालेली प्राथमिक माहिती अशी की, पुण्याहून नगरच्या दिशेने जाणाऱ्या आयशर टेंम्पोच्या (क्रमांक एमएच १६ सीडी ७९३३) चालकाचे नियंत्रण सुटल्याने टेंम्पो रस्ता दुभाजक ओलांडून विरूद्ध दिशेने, नगरहून पुण्याकडे जाणाऱ्या कारवर आदळला.या भिषण अपघातात कारमधील पाच वर्षांची चिमुरडी व आणखी एक प्रवासी जागीच ठार झाले तर इतर तीन ते चार प्रवासी गंभीर जखमी झाले.यातील मृत व जखमी व्यक्तींची नावे समजू शकली नाहीत.

अपघाताची माहिती मिळताच सुपे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड रुग्णवाहिका व फौजफाट्यासह घटनास्थळी पोहोचले.त्यांनी तातडीने कारमध्ये अडकलेल्या मृत व जखमींना बाहेर काढले.जखमींना उपचारासाठी सुपे येथील खासगी रुग्णालयात हलवले.दोन्ही वाहने नगरहून पुण्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर आडवी पडली होती.त्यामुळे वाहतूक कोंडी झाली होती.वाहने रस्त्यावरून दूर करण्यासाठी मदतकार्य सुरू करण्यात आले.

### काळे कुटूंबियांचे राणीताई लंके यांच्याकडून सांत्वन

उपचार सुरू आहेत. राणीताई लंके यांनी सांगितले की, पुर्वनियोजित जनसंवाद यात्रेमुळे नीलेश लंके हे व्यस्त असून त्यांच्याच सुचनेनुसार आपण वाकडी येथे येत काळे कुटूंबाची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

### गावठी कट्ट्यासह तिघे जेरबंद

बातमीदाराकडून मिळालेल्या माहीतीनुसार पुण्याकडून नगरच्या दिशेने एक कार भरधाव वेगाने जात असल्याचे पथकाच्या निदर्शनास आले. पथकाचा संशय बळावल्याने त्यांनी भरधाव कारच्या चालकास थांबण्याचा इशारा केल्यानंतर पुढे जाऊन कारचालकाने कार थांबवून त्यातील तिघेही तिथून पळून जाण्याचा प्रयत्न करू लागले. मात्र पथकातील कर्मचाऱ्यांनी पाठलाग करीत त्यांना ताब्यात घेतले.

आरोपींकडून ३० हजार रूपये किंमतीचा एक गावठी कट्टा, २ हजार रूपयांची दोन जीवंत काडतुसे ४ लाख रूपयांची स्विफट कार असा चार लाख ३२ हजार रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. हा कट्टा काडतुसांसह विक्रीसाठी घेऊन जात असल्याची कबुली आरोपींनी दिली. तिघाही आरोपींना मुद्देमालासह पारनेर पोलीसांच्या ताब्यात देण्यात येऊन त्यांच्या विरोधात आर्मॲक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

**हे आहेत आरोपी**
प्रमोद उर्फ अंकित किसनराव भस्के वय २८ रा. मरकळ, ता. खेड जि. पुणे, दिपक गोविंदा पाटील वय २३ रा. चाकण, ता. खेड, जि. पुणे व माऊली दादासाहेब भांबरे वय १९ रा. आळंदी, ता खेड, जि. पुणे.

ADMISSIONS OPEN 2024-25
प्रवेश सुरू २०२४-२५
PARNER PUBLIC SCHOOL
LKG, UKG, STD 1st
State Board
11th Science (State Board & NCERT Syllabus)
Integrated with NEET & MHT-CET
MHT-CET (Engg., NATA, Architecture, NDA, Other Entrance)
NEET (Medical, Agri, Pharmacy, Other Entrance)
G. M. INTERNATIONAL SCHOOL
LKG, UKG, STD 1st to 5th
CBSE Board

WALK IN INTERVIEW
A renowned English Medium School is looking for the following posts
TEACHERS REQUIRED / REQUIREMENT

| Sr. No. | Name of the post (Secondary Section) | No. of post | Qualification | Date of Interview | Experience |
|---|---|---|---|---|---|
| 1. | English Teacher | 2 | B.A./ M.A. B.Ed | Date: 6 April 2024 Time : 9.00 Am to 1.00 Pm | Fluency in English & Teaching experience is essential |
| 2. | Math Teacher | 2 | B.Sc./M.Sc. B.Ed. | | |

Note - Eligible and interested candidate can attend the interview for given posts on the dates given above
Vitthala Publicity
Sacchidanand Kala Krida &Shikshan Mandal
PARNER PUBLIC SCHOOL, PARNER
Parner Panoli road, near Vaishnavi Petrol pump
Tal - Parner Dist-Ahmednagar Pin-414302
For more details Call Us 9960875149

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे (म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST | MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
आमची वैशिष्ट्ये
- १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
- एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
- प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
- मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
- अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
- PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राउंडची व्यवस्था
- पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
ॲडमिशन ओपन
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# बहिष्काराचा इशारा आणि कुकडी नदीला पाणी!


## निघोज ग्रामस्थांच्या इशाऱ्यानंतर जलसंपदा खाते जागे

निघोज : प्रतिनिधी

**लोकसभा निवडणूकीच्या मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा निघोज ग्रामस्थांच्या वतीने देण्यात येताच जलसंपदा विभागाकडून माणिकडोह धरणातून कुकडी नदीपात्रात पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यात प्रसिध्द असलेल्या मळगंगा देवीच्या यात्रोत्सवाच्या पार्श्वभुमीवर हे पाणी सोडण्याची मागणी करण्यात आली होती.**

मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे कोषाध्यक्ष ज्ञानदेव लंके यांनी निवेदन प्रसिध्दीस देत यात्रोत्सवाच्या पार्श्वभुमीवर लाखो भाविकांची उपस्थिती पाहता नदी पात्रात पाणी सोडणे गरजेचे असल्याकडे लक्ष वेधले होते. त्याची दखल घेण्यात येऊन हा निर्णय घेण्यात येऊन नदी पात्रात पाणी सोडण्यास सुरूवातही करण्यात आली आहे. पाणी सोडण्यासंदर्भात सर्वपक्षीय नेते, विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनीही जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला होता.

मळगंगा देवीच्या यात्रोत्सवास २२ एप्रिल रोजी सुरूवात होउन ३ मे पर्यंत हा उत्सव सुरू असतो. त्यानंतर उरूस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती हे कार्यक्रम ६ मे पर्यंत सुरू असतात. यात्रा, उत्सव, जयंती उत्सवाच्या निमित्ताने लाखो भाविक निघोज येथे हजेरी लावतात. कुकडी डावा कालवा तसेच नदी पात्रात पाणी नसल्याने या भागात पाणी टंचाई आहे. यात्रोत्सव सुरू झाल्यानंतर लाखो भाविक, नागरीक आल्यानंतर पाण्याचे दुर्भीक्ष निर्माण होण्याची भिती होती. या पार्श्वभुमीवर नदीपात्रात पाणी सोडणे गरजेचे होते.



माणिकडोह धरणातून कुकडी नदी पात्रात पाणी सोडण्यास प्रारंभ झाला आहे.

### जलचरांवरही संकट

**जगप्रसिध्द रांजणखळगे हा परिसर जिल्हयातील पर्यटनाचा मानबिंदू माणला जातो. पाणी असेल त्यावेळी धबधबे तर पाणी नसल्यावर दिसणारे रांजणखळगे पाहण्यासारखे असतात. निघोज कुंडामध्ये मोठया प्रमाणावर जलचर असून देवमासा व इतर माशांचा त्यात समावेश आहे. कुंडात पाणी नसल्याने आहे त्या दुर्गंधीयुक्त पाण्यात शेकडो मासे मृत पावल्याचा व्हिडीओ नाना पाटील वराळ यांनी सोशल मीडियावर प्रसारीत केला होता. आता पाणी सोडण्यात आल्याने उर्वरीत जलचरांना जीवदान मिळणार आहे.**

### बंधाऱ्याची आवश्यकता

**जगप्रसिध्द रांजणखळगे परिसरात झुलता पुल असून पुलापुढे पाचशे ते सहाशे फुट अंतरावर एक बंधाऱ्याची आवश्यकता आहे. तसे झाल्यास कुंडामध्ये वर्षभर पाणी साठा राहून जलचर सुरक्षित राहू शकतात. या निसर्गनिर्मित कुंडामध्ये बोटींगची व्यवस्था झाल्यानंतर पर्यटक त्याचा आनंद घेऊ शकतील.**

# यात्रेची तयारी पूर्ण ; दुसऱ्या दिवशी लोकनाट्याचा कार्यक्रम

सुपा : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील कडूस येथील ग्रामदैवत काळ भैरवनाथ यात्रा उत्सवास मंगळवार दिनांक १६ रोजी प्रारंभ होत आहे. तीन दिवस चालणाऱ्या या यात्रेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती सरपंच मनोज मुंगसे व यात्रा कमिटीने दिली.**



नगर-पुणे महामार्गावरील पळवे फाट्यापासून सहा किलोमीटर अंतरावर कडूस हे गाव आहे. तालुक्यातील शेवटच्या टोकाचे गाव असलेल्या कडूस मध्ये ग्रामस्थांनी लोकवर्गणी व लोकसहभागातून भैरवनाथ मंदिर व मारुती मंदिराचा भव्य असा जीर्णोद्धार केला आहे. याठिकाणी यात्रेनिमित्त परिसरातील हजारो भाविक दर्शनासाठी येतात. येथील यात्रोत्सवास मंगळवार पासून प्रारंभ होत असल्याने तीन दिवस चालणाऱ्या यात्रे पूर्व तयारी पूर्ण झाली आहे. मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

रविवार दि.१४ रोजी सकाळी ७ ते ९ दरम्यान ग्रामदैवत काळभैरवनाथ यांना युवकांनी भीमाशंकर व विरोली या धार्मिक स्थळावरून पायी कावडीने आणलेल्या गंगाजलाने अभिषेक घालण्यात येईल व सायंकाळी ४ते ५ यावेळेत नाथसाहेबांना तेल लागेल.

मंगळवार दि.१६ रोजी सकाळी ६ वाजता भैरवनाथ महाराजांची महापूजा होणार आहे. त्यानंतर येणाऱ्या भाविकांच्या दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात येणार आहे. सायंकाळी ६ ते ९ दरम्यान शेरणी वाटप व काठ्यांची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. रात्री ९ ते १२ वाजता छबीना पालखीची गावातून वाजतगाजत मिरवणूक काढण्यात येणार आहे.

बुधवार दि.१७ रोजी दुपारी.४ ते ६ वाजता जंगी कुस्त्यांच्या हंगामाच्या कार्यक्रमाला सुरुवात होईल. कुस्त्यांचा कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर रात्री बुधवार दि.१७ रोजी रात्री ८ ते १२ वाजता मालती इनामदार यांचा लोकनाट्य तमाशा होईल.व दुसऱ्या गुरूवार दि.१८ रोजी सकाळी ठिक. ८:३० ते ११ दरम्यान हजेरीचा कार्यक्रम होईल.

तीन दिवस चालणाऱ्या या यात्रा उत्सवाचा परीसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन कडूस यात्रा कमिटी व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# सुपा परिसरातील ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसुरक्षा यंत्रणा कार्यान्वित होणार

## पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड यांचा पुढाकार



### ग्रामसुरक्षा यंत्रणेचे फायदे

**घटनाग्रस्त नागरिकांना परिसरातील नागरिकांची तातडीने मदत मिळणे, गावातील कार्यक्रम / घटना विना विलंब नागरीक/ग्रामस्थांना एकाच वेळी कळवणे. अफवांना आळा घालणे, प्रशासनाला नागरिकांशी जलद संवाद साधता येणे. पोलीस यंत्रणेस कायदा व सुव्यस्था कायम राखणे कामी नागरिकांचे सहकार्य मिळणे.**

सुपा : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील सुपा पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक अरुण आव्हाड यांच्या प्रयत्नातून ग्रामसुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत बुधवार दि. १० एप्रिल रोजी ग्रामसुरक्षा यंत्रणेचे प्रशिक्षण व समन्वय बैठकीचे सुपा पोलीस स्टेशन येथे आयोजन करण्यात आले.सदर बैठकीस ग्रामसेवक /ग्रामविकास अधिकारी, पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड, सहा. पोलीस निरीक्षक , गोपनीय अंमलदार यशवंत ठोंबरे व पत्रकार बांधव उपस्थित होते.**

पोलीस स्टेशन हद्दीत संकट काळात आपत्तिग्रस्त नागरिकाने ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या टोल फ्री नंबर १८००२७०३६०० / ९८२२११२२८१ वर कॉल केल्यास संबंधित व्यक्तीचा आवाज गावातील सर्व नागरिकांना कॉल स्वरूपात तत्काळ ऐकवला जाणार असल्याने गुन्ह्यांना आळा घालणे शक्य होणार आहे. असे ग्राम सुरक्षा यंत्रणेचे विभागीय अधिकारी राहुल लामखडे यांनी सांगितले. यादरम्यान पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड यांनी उपस्थित बांधवांना मार्गदर्शन केले.

ग्रामसुरक्षा यंत्रणा पोलीस स्टेशन हद्दीत कार्यान्वित करण्यासाठी ५० रुपये प्रति कुटुंब, प्रति वर्ष इतका खर्च येणार आहे. सदर खर्चाची तरतूद १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून करणेबाबतचे निर्देश यापूर्वीच जिल्हा परिषद कार्यालयाकडून ग्रामपंचायतींना देण्यात आलेले आहेत.

गेल्या १४ वर्षांत पुणे, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, सातारा जिल्ह्यातील ५५०० हून अधिक गावे व ग्रामीण पोलीस स्टेशन ग्राम सुरक्षा यंत्रणेत सहभागी झाले आहेत. ग्रामस्थ आपापले मोबाईल नंबर नोंदवून यंत्रणा वापरत आहेत. संपूर्ण भारतासाठी वापरता येणाऱ्या या टोल फ्री नंबरवर नोंदणी केलेल्या नागरिकाने आपत्ती काळात फोन केल्यास त्याचा आवाज परिसरातील हजारो नागरिकांना त्वरित मोबाईलवर ऐकू जातो. परिसरातील नागरिकांना घटना घडत असतांनाच घटनेची माहिती मिळाल्याने तातडीने मदत करणे व नुकसान टाळणे यामुळे शक्य होते.

# मंथन परीक्षेत तनपुरेवाडी शाळेचे विद्यार्थी चमकले

## अर्णव सोनवणे गुणवत्ता यादीत पाचवा



तनपुरेवाडी, निघोज : प्रतिनिधी

**मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेच्या जिल्हा व राज्य गुणवत्ता यादीत निघोजच्या तनपुरेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे विद्यार्थी चमकले. या शाळेच्या अर्णव अंकुश सोनवणे याने १५० पैकी १४२ गुण प्राप्त करून गुणवत्ता यादीत पाचवा क्रमांक मिळविला.**

तनपुरेवाडी शाळेतील अर्णव अंकुश सोनवणे १५० पैकी १४२ गुणवत्ता यादीत पाचवा तर श्रेयश शंकर मेहेर १५० पैकी १३४, श्रेयश सुरेश गाडीलकर १५० पैकी ११०, आरोही संतोष तनपुरे १५० पैकी ११० गुण प्राप्त करीत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणारे मुख्याध्यापक बन्सी गुंड, वर्गशिक्षिका श्रीमती भुकन यांचे शाळा व्यवस्थापन समिती तसेच पालकांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

# पारनेर महाविद्यालयात मुठभर धान्य, भांडयात पाणी उपक्रम

## आडवाटेचं पारनेर सेवाभावी संस्थेशी सामंजस्य करार

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर महाविद्यालयाचा मराठी विभाग व आडवाटेचं पारनेर कला, क्रीडा व सांस्कृतिक मंच यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात येऊन मुठभर धान्य आणि भांडयात पाणी यासह शैक्षणिक, सामाजिक, उपक्रम तसेच पशु पक्षी संवर्धनासाठी एकत्रीत उपक्रम राबविण्याचे ठरविण्यात आले.**



पारनेर महाविद्यालय व आडवाटेचं पारनेर यांच्यात मुठभर धान्य व भांडयात पाणी या उपक्रमासाठी सामंजस्य करार करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत पशुपक्षी संवर्धनासाठी पक्षांसाठी झाडांवर भांडी बसविण्यात आली असून त्यात पाणी व धान्य उपलब्ध करून देण्यात आले. याप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर म्हणाले, आज पर्यावरणचा ऱ्हास होत असताना एकूण पशुपक्षांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे.

हे लक्षात घेऊन आडवाटेचे पारनेर या सामाजिक संस्थेसोबत सामाजिक करार करण्यात आला. ही पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने अतिशय दिशादर्शक गोष्ट आहे. या करारामुळे अनेक सामाजिक उपक्रम महाविद्यालय राबविणार आहे. हे उपक्रम सामाजिक जाणीव जागृतीसाठी, समाजाची सामाजिक प्रगती होण्यासाठी महत्वपूर्ण असतील या उपक्रमामुळे सामाजिक जबाबदारीचे भान व सामाजिक मुल्यांची पेरणी विद्यार्थ्यांमध्ये निश्चित होईल. विद्यार्थ्यांनाही आपण पर्यावरण संवर्धनासाठी कशा पध्दतीने वेगवेगळे कृतिशील उपक्रम राबवावेत याची माहीती मिळण्यास मदत होईल असा विश्वास डॉ. मतकर यांनी व्यक्त केला.

यावेळी उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे, गुणवत्ता कक्षाचे समन्वयक डॉ. तुकाराम थोपटे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दीपक सोनटक्के, मराठी विभाग प्रमुख डॉ. हरेश शेळके, डॉ. नंदकुमार उदार, डॉ. माया लहारे, सावकार काकडे, रोहिणी दिघे, तुषार ठुबे, विनोद गोळे, अशोक गायकवाड व विद्यार्थी उपस्थित होते.

# काकणेवाडीचे युवराज वाळुंज यांची पीएसआयपदी निवड

## जिद्द व चिकाटीच्या जोरावर यश संपादन

काकणेवाडी : प्रतिनिधी

**काकणेवाडी येथील नबाजी रेवजी वाळुंज यांचे चिरंजीव युवराज वाळुंज यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परीक्षेतून पीएसआय पदी निवड झाली.काकणेवाडी गावातील पहिला पीएसआय होण्याचा मान युवराजला मिळाला आहे.**




कान्हूर पठार वि.का.से.सोसायटीचे संचालक पोपट रेवजी वाळुंज व हभप शिवाजी रेवजी वाळुंज यांचे ते पुतणे आहेत.लहानपणापासूनच हुशार विदयार्थी म्हणून त्याला ओळखत होते.जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर युवराजने हे यश प्राप्त केले आहे. त्याचे प्रा. शिक्षण जि.प. प्राथमिक शाळा काकनेवाडी व माध्यमिक शिक्षण ढोकेश्वर विद्यालय टाकळी ढोकेश्वर येथे झाले आहे.

युवराजचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. तालुक्याचे माजी आमदार नीलेश लंके, काकणेवाडी गावचे लोकनियुक्त सरपंच अशोक वाळुंज,उद्योजक भगवानशेठ वाळुंज सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच शंभूराजे मित्र मंडळाचे अध्यक्ष गवराम वाळुंज,उपाध्यक्ष हभप रंगनाथ महाराज वाळुंज व सर्व ग्रामस्थ मंडळींनी युवराजचे अभिनंदन केले.

# लक्ष्मीबाई वाळुंज यांचे निधन

काकणेवाडी : प्रतिनिधी

**काकणेवाडी येथील श्रीमती लक्ष्मीबाई गोडाजी वाळुंज यांचे शुक्रवारी पहाटे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.**



वर्षभरापूर्वी पती गोडाजी वाळुंज यांचे निधन झाले होते.त्यांचा स्वभाव अत्यंत प्रेमळ आणि मायाळू होता. त्यांच्या पाठीमागे चार मुले,एक मुलगी,सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. आपल्या संस्काराच्या जोरावर या मातेने भास्कर वाळुंज यांना सर, इंजि.दत्तात्रय वाळुंज प्रगतशील शेतकरी, रावसाहेब वाळुंज आदर्श शिक्षक, मंगेश वाळुंज डॉक्टर अशी मुले घडवली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर : आदर्श लोकप्रतिनिधी

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १33 वी.जयंती संपूर्ण जगभरामध्ये जल्लोषात साजरी होत आहे. त्या निमित्ताने पारनेर दर्शनच्या वाचकांच्या वतीने महामानवास त्रिवार अभिवादन !**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विद्यार्थी दशकापासून अखेरपर्यंत एक आदर्श लोकप्रतिनिधी म्हणून केलेली संघर्षमय सेवाभावी वाटचाल नव्या पिढीने एक प्रेरणा व स्फूर्ती म्हणून घेण्याची गरज आहे.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे अव्वल दर्जाचे संसदपटू होते. मुंबई राज्य विधानसभा व भारतीय राज्यसभा सदस्य असताना त्यांनी केलेले कार्य त्यांच्या संसद पटुत्वाची साक्ष देते. राज्यसभेचे सदस्य असताना राज्यसभेच्या एका कोपऱ्यात उभे राहणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर दुसऱ्या कोपऱ्यात उभे राहणारे डॉ. श्याम प्रसाद मुखर्जी व तिसऱ्या कोपऱ्यात उभे राहणारे एच.व्ही कामत यांना पाहताच तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांना घाम फुटत होता. अत्यंत अभ्यासपूर्ण असलेल्या चर्चेला उत्तर देताना संबंधित खात्याचे मंत्रीच नव्हेत तर पंतप्रधान यांची बोबडी वळत होती.

बाबासाहेब हे निकोप लोकशाहीवादी होते. आणि या लोकशाहीचा महत्त्वाचा खांब असतो तो सभागृह. या सभागृहात चर्चेअंती निर्णय हे लोकशाहीचे अंगभूत तत्व असते. या सभागृहांपैकी स्वबळावर १९३७ साली स्वतंत्र मजूर पक्षाच्या वतीने मुंबईतील परळ भायखळा मतदार संघातून निवडून आलेले होते.या १० नंबरच्या मतदारसंघात काँग्रेस पक्षाने बाबासाहेबांविरुद्ध निवडणुकीत उतरवले होते ते त्यांच्या सहकाऱ्यांना. १९३७ च्या या निवडणुकीत बाबासाहेबांनी विरुद्ध पी बाळू ( बाळू पालवणकर ) हे क्रिकेटपटू व पा.न. राजभोज हे उमेदवारी करत होते.

बाबासाहेबांनी त्यावेळी सर्वसमावेशक भूमिका ( आजच्या भाषेत बहुजनांना न्याय्य) घेतली असल्यामुळे त्यांना १,३२४५ मते पडली. तर विरोधक पी. बाळू यांना ४३७ तर राजभोज यांना केवळ २०५ मते मिळवून ते पराभूत झाले. बाबासाहेबांनी १५ उमेदवार उभे केले व त्यापैकी १३ उमेदवार निवडून आले. जे २ उमेदवार पराभूत झाले तेही अल्पमताने.



**उद्योग व्यवसायात यशस्वी व्हायचे असेल तर मेहनतीशिवाय पर्याय नाही. उद्योग व्यवसाय सुरू करताना व व्यवसाय सुरू केल्यानंतर आपण आपल्या ग्राहकांना कमी किमतीतव्हिजन पेरणारा लोकनेता सर्व समाजाला कवेत घेऊन विकास,स्वाभिमानाच्या दिशेकडे घेऊन जाण्याचे व्हिजन भारतीय राज्यघटना, हिंदू कोड बिल,समान नागरी कायदा अशा सर्व गुंतागुंतीच्या विषयांमध्ये सुद्धा दिसते.राज्यघटनेचा मूलभूत ढाचा ही बाबासाहेबांची देणगी आहे पंडित नेहरूंचे मत होते की घटनेत बदल करण्याचे सर्व अधिकार संसदे कडे असावेत बाबासाहेबांनी दाखवून दिले की घटना संसद निर्माण करते. संसद घटना निर्माण करू शकत नाही म्हणजेच घटनेचे चरित्र ज्या बदलांनी पालटून जाईल असे बदल करण्याचे अधिकार संसदेला असता कामा नयेत. बाबासाहेबांची ही खूप मोठी दूरदृष्टी होती त्यांनी तसा विचार केला नसता तर मतांच्या राजकारणात संसदीय बहुमताच्या गदारोळात सापडून राज्यघटनेची कधीच धूळधाण उडाली असती त्यामुळे बाबासाहेब खऱ्या अर्थाने व्हिजन पेरणारे नेते ठरतात.**

१९३७ ते १९४२ स्वतंत्र मजूर पक्षाचे आमदार म्हणून बाबासाहेब श्रेष्ठ दर्जाचे लोकप्रतिनिधी म्हणून नोंदविले गेले आहेत. त्याआधी ते मुंबई विधान परिषदेवर निवडून आले होते. १९२७ च्या फेब्रुवारी महिन्यात त्यांची नियुक्ती झाली त्यामुळे १९-२० मार्च १९२७ च्या धर्मसंगराच्या वेळी (महाड रणसंग्राम) ते आमदार होते. आणि त्यामुळेच जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस प्रमुख यांना त्यांच्याशी अदबीने वागावे लागत होते. या लोकप्रतिनिधित्व आधी सगळ्यात महत्त्वाचे प्रतिनिधित्व म्हणजे ते विद्यार्थी असतानाच लोकप्रतिनिधी म्हणून नियुक्त झाले होते.

या लोकप्रतिनिधित्वाबद्दल बाबासाहेबांचे मुख्य चरित्रकार धनंजय कीर व चा.भ. खैरमोडे यांनी नोंद घेतलेली दिसत नाही. ही नियुक्ती केली होती बडोदे संस्थानचे छत्रपती सयाजीराव गायकवाड यांनी ही नियुक्ती १९१३ साली म्हणजे भीमराव आंबेडकर हे एम ए. पी एचडी. एल.एल.डी. झाली नव्हते. त्या विद्यार्थी अवस्थेत ते फक्त बीए पास झाले होते.

विद्यार्थी दशेतच म्हणजे बीए ही पदवी संपादन केल्यावर एखादा विद्यार्थी एखाद्या कौन्सिलचा सदस्य होईल ही अशक्यप्राय घटना,परंतु बाबासाहेबांबाबत ती शक्य झाली.१९१३ साली बडोदा संस्थांच्या लेजीस्लेटीव कौन्सिलचे ते अतिरिक्त सदस्य झाले व तसा हुकूमनामा संस्थानचे दिवाण मनुभाई मेहता यांच्या स्वाक्षरीने काढण्यात आला. विद्यार्थी दशेपासून अखेरपर्यंत बाबासाहेब लोकप्रतिनिधी म्हणून जगले लोकशाहीचे संवर्धन करू शकले.

**संकलन**
**स्वप्नील भालेराव (पत्रकार)**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S) Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com